

## मयूरराजांची स्वारी...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसर म्हणजे अलीकडे मयूरनगरीच झाली आहे. येथील मोरांचा मुक्त संचार सर्वांना मोहित करतो. वन्यजीव सप्ताहानिमित्त अशाच एका मयूरराजांची स्वारी थाटात रस्ता ओलांडतानाचा टिपलेला क्षण.

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# कुलगुरुपदाच्या शर्यतीमध्ये कोल्हापूरचे तिघे

## सांगली, औरंगाबादच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश : विज्ञानशाखेच्या चौघांचा तर विद्याशाखेतील एक उमेदवार : उद्या अंतिम मुलाखती



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कुलगुरुपदाच्या अंतिम मुलाखात प्रक्रियेसाठी निवड झालेल्या पाच उमेदवारांमध्ये तीन उमेदवार हे कोल्हापूरचे आहेत. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. अंजली कुरणे यांचा समावेश आहे. तर डॉ. अविनाश कुंभार हे इस्लामपूर येथील आहेत. तसेच डॉ. के. व्ही. काळे हे सालुखेड (जि. औरंगाबाद) येथील आहेत. कुलगुरुपदासाठी १६९ उमेदवारांनी अर्ज केले होते. यातून २५ उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती त्रिसदस्यीय शोध समितीकडून घेण्यात आल्या. यातून पात्र ठरलेल्या पाच उमेदवारांच्या सोमवारी ऑनलाईन मुलाखती होणार आहेत.

**चार उमेदवार शास्त्र शाखेचे**

अंतिम पाच उमेदवारांपैकी चार उमेदवार हे शास्त्र शाखेतील आहेत. त्यामध्ये डॉ. डी. टी. शिर्के, के. व्ही. काळे, नितीन देसाई, अविनाश कुंभार यांचा समावेश आहे.

### डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के



- वाठार तर्फे वडगांव (ता. हातकणंगले), **जन्मतारीख ११ जून १९६५**
- शिक्षण एमएससी (संख्याशास्त्र) एमफील, पी. एचडी,
- सध्या शिवाजी विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक पदावर कार्यरत
- विविध पदांवर काम, प्र – कुलगुरु, कुलसचिव, संख्याशास्त्र विभागप्रमुख, अधिसभेसह विविध अधिकार मंडळांवर काम केले आहे.
- शिक्षण क्षेत्रातील अनुभव ३३ वर्षे
- कुलगुरु पदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये पहिल्यांदाच निवड

### डॉ. नितीन शिवाजीराव देसाई



- **मुळ गाव : तळेवाडी (ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर) जन्मतारीख १३ जून १९६९**
- शिक्षण एम. एस्सी पीएचडी **(सायकोजेनेटीक)**
- **मुंबई येथील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ** मॅनेजमेंट स्टडीजमधील विज्ञानशाखेचे अधिष्ठाता
- **विविध पदांवर काम परीक्षा नियंत्रक (अमेठी युनिव्हर्सिटी) विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता (डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठ नवी मुंबई)**
- शिक्षण क्षेत्रातील अनुभव २८ वर्षे
- कुलगुरुपदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये दुसऱ्यांदा निवड

### डॉ. अंजली दिनकर कुरणे



- मुळ गाव : शिवाजी पेठ कोल्हापूर सध्या रा. **पुणे, जन्मतारीख २५ नोव्हेंबर १९६४**
- **शिक्षण बी. एस्सी. (प्राणीशास्त्र), एम.एस्सी आणि पीएचडी (मानवशास्त्र सामाजिकशास्त्र)**
- सध्या कार्यरत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता, मानवशास्त्र तज्ञ
- विविध पदांवर काम मानवशास्त्र विभागप्रमुख, इंटर डिसीप्लिनरी स्कूलच्या संचालक, सामाजिकशास्त्रे आणि मानवविद्या केंद्राच्या समन्वयक
- शिक्षणक्षेत्रातील अनुभव २९ वर्षे
- कुलगुरुपदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये पहिल्यांदाच निवड

### डॉ. अविनाश शंकर कुंभार



- **मुळ गाव : इस्लामपूर (जि. सांगली),** जन्मतारीख १५ एप्रिल १९६५
- शिक्षण बी. एस्सी, एम. एसस्सी, पीएचडी (रसायनशास्त्र)
- सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागामध्ये कार्यरत
- विविध पदांवर काम रसायनशास्त्राच्या अभ्यासमंडळाचे अध्यक्ष, अद्ययावत **उपकरण केंद्राचे संचालक, इंटरडिसिप्लीनरी स्कूल अँड सायन्सचे प्रमुख**
- शिक्षण क्षेत्रातील अनुभव ३० वर्षे
- कुलगुरु पदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये पहिल्यांदाच निवड



### डॉ. कारभारी विश्वनाथ तथा के. व्ही. काळे

- **मुळ गाव सालुखेड (जि. औरंगाबाद) जन्मतारीख १८ जून** १९६२)
- शिक्षण एम. एस्सी, एमसीए, **पीएच. डी. (इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी)**
- सध्या कार्यरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातील वरिष्ठ प्राध्यापक
- विविधपदांवर काम प्रभारी कुलगुरु आणि कुलसचिव, **बीसीयूडी संचालक विभागप्रमुख** विविध अधिकार मंडळांवर काम,
- शिक्षणक्षेत्रातील अनुभव ३२ वर्षे
- कुलगुरु पदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये चौथ्यांदा निवड

# विद्यापीठ उभारणार महाविद्यालयांत सॅटेलाईट सेंटर

## तीन वर्षांनंतर नूतनीकरण बंधनकारक; विद्यार्थ्यांना होणार फायदा

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांमध्ये सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण, डोंगराळ दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची व्यवस्था होणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

पुढारी विशेष

राज्य सरकारने ग्रामीणसह इतर ठिकाणच्या महाविद्यालयांना त्यांच्या संलग्न विद्यापीठ कार्यक्षेत्रात सॅटेलाईन केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्याअनुषंगाने सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतील महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सॅटेलाईट केंद्र सरू करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

महाविद्यालयाचे सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी इच्छुक संस्थांना प्रस्तावासह केंद्राचा पंचवार्षिक आढावा अहवाल, त्या परिसरात हे केंद्र सुरू करण्याची आवश्यकता असल्याचा सर्वेक्षण अहवाल सादर करावा लागणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठाच्या प्रचलित पद्धतीनुसार श्रेयांक पद्धतीचे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम या केंद्रात राबविले जाणार आहेत. प्रस्ताविक अभ्यासक्रम, आवश्यक प्रयोगशाळा, पुस्तके उपलब्ध करण्याबाबतचे नियम विद्यापीठ तयार करणार आहे. सॅटेलाईट सेंटरमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सुचविल्याप्रमाणे दूरशिक्षण अभ्यासक्रमाच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञान यंत्रणेची उपलब्धता यावर भर देण्यात येणार आहे. विद्यापीठास पाच वर्षांच्या बृहत आराखड्यासह प्रत्येक वर्षी वार्षिक योजना तयार करावी लागणार आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. अशाठिकाणी प्राधान्य द्यावे लागणार आहे.

> “
> शिवाजी विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यात सॅटेलाईट सेंटर कोणत्या ठिकाणी सुरू करता येईल, याबाबतची माहिती देण्यात आली आहे. या सेंटरमुळे ग्रामीणसह डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळणार असून शिक्षण प्रवाहात येण्यास मदत होईल.
> **- डॉ. विलास नांदवडेकर,**
> कुलसचिव

महाविद्यालयाच्या मुख्य केंद्रापासून दोनशे कि.मी. परिसरात सॅटेलाईट केंद्राची स्थापना करता येणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत ही मर्यादा तीनशे कि.मी. पर्यंत वाढविता येणार आहे. सॅटेलाईट केंद्रासाठी संबंधित महाविद्यालयातील प्राध्यापकाची केंद्र समन्वयक म्हणून तीन वर्षांसाठी नियुक्ती करावी लागणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेर केंद्राची स्थापना करता येणार नाही. प्रस्तावित केंद्रापासून १५ कि.मी. परिसरात त्या अभ्यासक्रमाचे दुसरे महाविद्यालय असता कामा नये, असे शासन निर्णयात नमूद केले आहे. सुरुवातीला एका महाविद्यालयास एकच सॅटेलाईट केंद्र सुरू करता येणार आहे. तीन वर्ष यशस्वीरीत्या केंद्र चालविल्यानंतर वाढीव सॅटेलाईट केंद्राचा प्रस्ताव सादर करता येणार आहे. सॅटेलाईट केंद्राच्या संलग्निकरणाचे नूतनीकरण दर तीन वर्षानि करणे बंधनकारक असणार आहे.

### ...यांनी अर्ज करू नये

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलमाप्रमाणे नॅक, एनबीए या संस्थांकडून मानांकन, पुनर्मूल्यांकन करून न घेतलेल्या, १० वर्षांपेक्षा कमी कालावधी झालेल्या आणि सॅटेलाईट केंद्राचे ठिकाण ग्रामीण आदिवासी नसलेल्या महाविद्यालयांनी सॅटेलाईट केंद्रासाठी अर्ज करू नये, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिल्या आहेत.